लोकमत




रत्नागिरीतील फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशनतर्फे जिल्हा रुग्णालयासाठी जिल्हाधिकारी लक्ष्मीनारायण मिश्रा आणि जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संघमित्रा फुले यांच्याकडे ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर भेट देण्यात आला.

# जिल्हा रुग्णालयाला कॉन्सन्ट्रेटर भेट

लोकमत न्यूज नेटवर्क

**रत्नागिरी :** फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशनने एक पाऊल पुढे टाकत जिल्हा रुग्णालयाला १० ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर संच देणगी स्वरूपात देण्यात आले. जिल्हाधिकारी लक्ष्मीनारायण मिश्रा आणि जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संघमित्रा फुले - गावडे यांच्याकडे हे कॉन्सन्टेटर देण्यात आले.

सध्या देशभरात ऑक्सिजन वायूची कमतरता आणि कोविड १९ रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता, ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर देणगी देऊन रुग्णालयाला पाठिंबा द्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आणि जिल्हा शल्यचिकित्सक यांनी केले होते. याचाच एक भाग म्हणून १४ मे रोजी फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशनने १० ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर दिले. जिल्हाधिकारी लक्ष्मीनारायण मिश्रा व जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संघमित्रा फुले - गावडे यांनी कोविड १९ या परिस्थितीत निरंतर पाठिंबा दिल्याबद्दल मुकुल माधव फाऊंडेशनच्या विश्वस्थ रितू प्रकाश छाब्रिया यांचे आभार मानले.

Hello Ratnagiri
Page No. 3 May 17, 2021
Powered by: erelego.com